माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.७३३५/२१/अ.क्र.५८६६/२४/०१**
**क्र. मुमाआ/नों.क्र.८२१४/२१/अ.क्र.५८६७/२४/०१**

**श्री. मंगेश बी. कदम**
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) एच/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उ. यांचे कार्यालय,
पी/दक्षिण विभाग इमारत, दुसरा मजला, सीटीएस क्र. ७४६, सिटी सेंटर मॉल समोर,
व्हिलेज पहाडी, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०० १०४.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परि.३**
बृहन्मुंबई महानगरपालिका, उप प्रमुख अभियंता (रस्ते) प.उ. यांचे कार्यालय,
पी/दक्षिण विभाग इमारत, दुसरा मजला, सीटीएस क्र. ७४६, सिटी सेंटर मॉल समोर,
व्हिलेज पहाडी, एस.व्ही.रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०० १०४.
**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.११.२०२४**

अपीलकर्ता : उपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. ०६.११.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १५.१२.२०२० | ३०.१२.२०२० | २२.०१.२०२१ | १८.०२.२०२१ |
| १५.१२.२०२० | ०५.०१.२०२१ | २२.०१.२०२१ | २१.०६.२०२१ |

अपिलकर्तानी जन माहिती अधिकारी यांचे दि. ३०.१२.२०२० व दि. ०५.०१.२०२१ रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि. १८.०२.२०२१ व दि. २१.०६.२०२१ रोजीचे आदेश संलग्न करुन दि. २८.०६.२०२१ व दि. २३.०७.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि. १५.१२.२०२० अन्वये "AW 277 व AW १४४ संबंधित कामाची मुद्येनिहाय माहिती खालीलप्रमाणे विचारलेली आहे :-

१. पी.ओ.
२. एम.बी.
३. प्रमाणपत्र प्रमाणपत्र
४. व्हिजिलन्स ऑब्जर्वेशन अॅण्ड कंप्लाईन्स रिपोर्ट व सपोर्टिंग फोटो.
५. काम सुरु असतानाचे व काम पुर्ण झाल्याचे फोटो
६. इपोक्सी चलन
७. खोदाई नोंदणी
८. अस्पाल्ट चालणे

९. मटेरियल चलने

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक ३०.१२.२०२० व दि. ०५.०१.२०२१ नुसार अपिलार्थी यांना कळविले आहे की, अपीलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीचे निरिक्षण करुन योग्य ते शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २२.०१.२०२१ रोजी प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८.०२.२०२१ व दि. २१.०६.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) एच/पश्चिम विभाग यांनी अपीलार्थी यांना उपलब्ध माहिती ७ दिवसांत देण्यात यावी" असे आदेश पारीत करुन प्रथम अपील निकाली काढले.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असून जन महिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी दि. १५.१२.२०२० रोजी AW 277 व AW १४४ संबंधित कामाची मुद्येनिहाय माहिती विचारलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस एकूण १३९८ व ७६५ प्रतींसाठी रु. २७९६/- व रु. १५३०/- इतके शुल्क भरणा केल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल, असे कळविण्यांत आले आहे.

सदर चलन शुल्क भरल्यानंतर सुध्दा जाणूनबुजून माहिती दिली नाही, असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परि.३ यांनी दि. १८.०२.२०२१ व दि. २१.०६.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) एच/पश्चिम विभाग यांनी अपीलार्थी यांना उपलब्ध माहिती ७ दिवसांत देण्यात यावी" असे आदेश पारित केले आहे.

अपीलार्थी यांनी आयोगासमोर असे सादर केले की, दि. २२.०१.२०२१ रोजी जन माहिती अधिकारी यांनी कळविण्यांत आले की, चलन शुल्क भरल्यानंतर सुध्दा माहिती दिली नाही.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परि.३ यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) एच/पश्चिम विभाग यांना आदेशित करुन सुध्दा अपीलार्थी यांना माहिती दिली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) एच/पश्चिम विभाग व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) परि.३ यांनी आजच्या सुनावणीस का उपस्थित राहू शकले नाहीत, याबाबतचा लेखी खुलासासह दिनांक १७.१२.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.१२.२०२४ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

प्रदीप व्यास
19-11-2024

मुंबई
दिनांक :१९.११.२०२४

( डॉ.प्रदीप व्यास )
राज्य मुख्य माहिती आयुक्त